|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ४ (प्रतिनीधी ) विद्यापीठातील कवयित्री बहिणाबाई चौधरी अर्धाकृती पुतळा अनावरण व ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील सुसज्ज सभागृहाचे उद्घाटन राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तसेच जळगाव जिल्हयाचे पालक मंत्री श्री. गुलाबरावजी पाटील यांच्या हस्ते उद्या दि ५ जुलै, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठात संपन्न होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. विजय माहेश्वरी तर केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा केंद्रीय राज्य मंत्री श्रीमती रक्षा खडसे, राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री.गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री श्री. संजय सावकारे, खासदार ॲड. श्री. उज्वल निकम, खासदार श्रीमती स्मिता वाघ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या कार्यक्रमात जळगाव महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती दीपमाला काळे, विधान परिषद सदस्य **आमदार श्री.एकनाथराव खडसे, आमदार श्री. किशोर दराडे,** आमदार **श्री. सत्यजीत तांबे,** आमदार **डॉ. मनीषा कायंदे,** आमदार **श्री. नंदकिशोर महाजन, विधान सभा सदस्य आमदार श्री. सुरेश भोळे, आमदार श्री. किशोर पाटील, आमदार श्री. चंद्रकांत सोनवणे, आमदार श्री. अनिल पाटील,आमदार श्री. चंद्रकांत पाटील, आमदार श्री. मंगेश चव्हाण, आमदार श्री. अमोल पाटील, आमदार श्री. अमोल जावळे**, विद्यापीठ सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री अशोक जैन, जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करिश्मा नायर, पोलिस अधिक्षक श्री. श्रीकांत धिवरे व प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे यांची उपस्थिती असणार आहे.

विद्यापीठात कवयित्री बहिणाबाई चौधरी अर्धाकृती पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याकरीता व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली. कवयित्री बहिणाबाई चौधरी अर्धाकृती पुतळा उभारण्याकरीता जिल्हा नियोजन समितीकडून दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध

करुन देण्यात आला. हा अर्धाकृती पुतळा चार फूट उंचीचा असून ब्रांझ धातूमध्ये तयार करण्यात आला. पुणे येथील मूर्तिकार दीपक थोपटे यांनी तयार केला आहे. हा अर्धाकृती उभारण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता प्रशांत सोनवणे व इतर अधिकारी यांचे सहकार्य लाभले. तसेच ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील सुसज्ज सभागृहाच्या उभारणी करीता प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत एक कोटी बारा लाख रुपयांचा निधी केंद्र व राज्य सरकारने उपलब्ध करुन दिला आहे. हे सभागृह ५६० चौरस मीटर मध्ये उभारले असून ४१८ आसन क्षमता या सभागृहाची आहे.

हा समारंभाकरीता विद्यापीठाचे सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य व विद्या परीषद तसेच विविध प्राधिकरणाचे सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व नागरीक उपस्थित राहणार आहेत अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

---------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. कबचौउमवि/१६/२०२६ दि.४ जुलै २०२६

प्रति

मा. संपादक,

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता